# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
## (महाराष्ट्र शासन अंगिकृत)

क्र.मऔविम/प्राअ(मावतं)विभाग/P-680354/२०२६ दिनांक : 5 MAY 2026

## परिपत्रक

विषय : माहिती तंत्रज्ञान उद्यानात वाटप केलेल्या भूखंडाच्या विकासासाठी सह-विकासक (Co-Developer) नेमणेबाबतच्या परिपत्रकास मुदतवाढ देणेबाबत

संदर्भ : १. परिपत्रक क्र.मऔविम/सह मुकाअ(मा/तं)/विधी व कामकाज/९४/२००९ दिनांक ११/११/२००९.
२ परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/६३४७०/२०१३ दि.२७/०२/२०१३.
३. परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/बी३९८५७/२०१५ दि.११/०५/२०१५
४. परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/डी१४८४१/२०१६ दि.२७/०९/२०१६
५ परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/२२१००/२०१३ दि.१८/१२/२०१८.
६. परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/डी०९३१८/२०२० दि.२५/११/२०२०.
७. परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/सी-२३०८५ /२०२३ दि.०९/०२/२०२३.
८. परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/पी-३५७००१/२०२४ दि.२७/११/२०२४

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात होत असलेली घसरण, जागतिक, औद्योगिक तसेच आर्थिक मंदी याचा विचार करता विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) मधील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा (IT/ITES) क्षेत्रातील उद्योजकांना वाटप केलेल्या भूखंडाच्या विकासासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने तसेच भूखंडाचा विकास शिघ्र गतीने होण्याच्या दृष्टीने उपरोक्त संदर्भिय परिपत्रक क्र ८ अन्वये सह विकासक (Co-Developer) नेमण्यासाठी विहित केलेला कालावधी संपुष्टात आल्याने व या क्षेत्रातील उद्योजकाकडून सह-विकासक नेमण्यास परवानगी देण्यासंबधाने प्राप्त झालेली निवेदने / प्रस्ताव विचारात घेता, सह-विकासक नेमण्याचा कालावधी वाढविण्याबाबतचा विषय महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक २४/०३/२०२६ रोजी झालेल्या ४१० व्या सभेत सादर करण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठराव क्रमांक ७१५८ पारीत करण्यात आला. सदर ठरावाचे अनुषंगाने विशेष

मुख्य कार्यालय : "उद्योगसारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. दुरध्वनी: (०२२) ४७४८८३१२ / ४६९९ / ४६७९
वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई कार्यालय: ४,४(ए), १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कॉम्प्लेक्स - १, कफ परेड, मुंबई - ४०० ००५. दुरध्वनी : ४०१६ १४५१/५४
वेबसाईट : https://www.midcindia.org

आर्थिक क्षेत्र (SEZ) मधील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा क्षेत्रातील उद्योजकांना भूखंड विकासासाठी

प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने तसेच त्यांना वाटप केलेल्या भूखंडाचा विकास शिघ्र गतीने होण्याच्या दृष्टीने सह-विकासक (Co-Developer) ची प्रकरणे गुणवत्ता निहाय तपासून महामंडळाचे उपरोक्त संदर्भिय दि. ११/११/२००९ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या अटी व शर्तीवर दिनांक २७/११/२०२४ च्या परिपत्रकास मा.संचालक मडळाच्या दिनांक २४/०३/२०२६ रोजीच्या ४१० व्या बैठकीमधील ठराव क्र ७१५८ नुसार दि.०१/०४/२०२६ ते दि.३१/०३/२०२८ असा पुढे दोन वर्ष वाढवणे तसेच सह-विकासक (Co-Developer) मंजूरीचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई-९३

प्रत :

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. महाव्यवस्थापक (भूमी / विधी / भूसंपादन/ मा व तं / जनसंपर्क / म.ब.वि /डीएमआयसी / पणन )
४. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
५. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
६. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
७. सह /उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई /पुणे /औरंगाबाद /नागपूर.
८. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केन्द्र.
९. सर्व औद्योगिक संघटना.
१०. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केन्द्र (डब्ल्यु.टी.सी), कफ परेड, मुंबई.